बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंग) सुरक्षा रक्षकांच्या सेवेचा मोबदला अदा करण्यासाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः सुरमा-२०१७/ प्र.क्र.१३८/ आरोग्य-४,

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई-४०० ००१,
तारीख: १९ जानेवारी, २०१८

<u>वाचा :-</u>

१) **संचालक, आरोग्य सेवा,संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. : आसेसं/आस्था/कक्ष-५/टे-८/सुरक्षा रक्षक/११५२-५३/१७, दि.०८.०३.२०१७.**

२) **उपसंचालक, आरोग्य सेवा परिवहन, पुणे यांचे पत्र क्रमांकः आसेप/आस्था/कक्ष ११६-I/ विकापुणे/सुरक्षा रक्षक सेवा/८५५६-५७/२०१७, दि.०४.१२.२०१७.**

<u>प्रस्तावना :-</u>

उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे त्यांचे कार्यालयाच्या आवारात वाहनांचे स्पेअर पार्टस, निर्लेखित व चालू वाहने, दुरुस्तीस प्राप्त वाहने इ. असल्याने, त्या कार्यालयाच्या सुरक्षेसाठी शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१०/प्र.क्र.८४/१०/वित्तीय सुधारणा-१, दि.०२.०८.२०१६ मधील तरतूदीनुसार बाह्ययंत्रणेद्वारे तीन सुरक्षा रक्षकांच्या सेवा जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांचेकडून माहे ऑगस्ट, २०१६ ते जून, २०१७ या कालावधीत उपलब्ध करुन घेण्यात आल्या होत्या. त्या सुरक्षा रक्षकाच्या सेवेपोटी रु.५,९८,५४२/- (अक्षरी रुपये पाच लक्ष, अठ्ठयांनऊ हजार, पाचशे बेचाळीस फक्त) इतकी रक्कम जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांना अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे यांचे कार्यालयाच्या सुरक्षेसाठी जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांचेकडून माहे ऑगस्ट, २०१६ ते जून, २०१७ या कालावधीत घेण्यात आलेल्या तीन सुरक्षा रक्षकांच्या सेवेपोटी रु.५,९८,५४२/- (अक्षरी रुपये पाच लक्ष, अठ्ठयांनऊ हजार, पाचशे बेचाळीस फक्त) इतकी रक्कम जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांना अदा करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मदतीने त्यांचे कार्यालयाचे मोजमाप करुन व त्यानुसार प्रचलित कार्यध्दतीने निविदा प्रक्रियापूर्ण करुन संबंधित कंत्राटदार / संस्था यांचेशी योग्य प्रकारे करार केलेला असावा.

२) बाह्य यंत्रणेद्वारे काम करुन घेताना आवश्यक कामे ठेकेदार /कंपनी / संस्थेकडून शासनाचे विहीत पध्दतीने निविदा मागवून सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने केलेले असावे.

३) ज्या कंपनीस / संस्थेस काम सोपविले होते. त्यांचे बरोबर त्याबाबतचा करार झालेला असावा. सदर करारात आवश्यकतेनुसार अटी व शर्ती नमूद असाव्यात. या करारामध्ये कंपनी / संस्थेतर्फे काम करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर नसावे.

४) बाह्य यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याकरीता कोणतीही पदनिर्मिती केली जाणार नाही.

५) बाह्य यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याच्या कामाचे प्रदान "वेतन" या तपशीलवार शिर्षाखाली न दाखविता "कार्यालयीन खर्च" या तपशीलवार शिर्षाखाली दाखविणे आवश्यक आहे.

६) बाह्य यंत्रणेद्वारे कामे करुन घेताना, जर ती कामे नियमितपणे पदनिर्मिती करुन केली असता जितका खर्च आला असता, त्या खर्चाच्या कमीत कमी १० ते २५ टक्के इतकी बचत होणे आवश्यक आहे.

७) शासनाने विहित केलेल्या पध्दतीने निविदा प्रक्रिया पार पाडून अत्यंत पारदर्शक पध्दतीने बाह्ययंत्रणेची निवड केलेली असावी.

८) नियमित पध्दतीने पदे भरण्यावरील खर्चाच्या तुलनेत बाह्ययंत्रणेद्वारे उपरोक्तनुसार सेवा घेताना खर्चात १० ते २५ टक्के बचत झाली असल्याबाबतचा तपशील, शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दि.०२.१२.२०१३ सोबतच्या प्रपत्रात शासनास तात्काळ सादर करणे आवश्यक आहे.

९) वरील सूचनांचे कोटेकोरपणे पालन सर्व संबंधितांनी करावे, अन्यथा संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१०) याकरीता होणारा खर्च विहित पध्दतीने करण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक-विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५, अन्वये, वित्तिय अधिकार नियम पुस्तिका- १९७८ भाग-पहिला, उपविभाग-एक मधील अ.क्र.६, नियम क्र. ४० अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील आवर्ती खर्च "मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, (०१) (१०) सार्वजनिक आरोग्य परिवहन संघटनेची आस्थापना, (१३) कार्यालयीन खर्च (अनिवार्य) (२२१० १०५३)" या लेखाशिर्षाखालील सन २०१७-१८ या वित्तिय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११७१६३३४८९८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.01.19 15:55:10 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
३. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
७. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
८. वित्त विभाग, (कार्यासन- विनियम), मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (आरोग्य-४).